**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक – थकित – २०१७/२०१७-१८/१२/वेतनपथक, पुणे दिनांक – २८ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी,
शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.

कुलसचिव,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

**विषय - सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील थकित देयकांची माहिती सादर करणेबाबत.**

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामधील आपल्या थकित रक्कमांचे सर्व प्रस्ताव खाली नमूद केलेल्या दिनांकास, वेळेत व ठिकाणी सादर करण्यात यावेत.

| अ. क्र. | जिल्ह्याचे नांव | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | पुणे जिल्हा | ०३ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | प्रस्तूत कार्यालय – पुणे जिल्ह्यातील अ.क्र. ०१ ते १७ महाविद्यालये |
| २ | पुणे जिल्हा | ०५ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | प्रस्तूत कार्यालय – पुणे जिल्ह्यातील अ.क्र. १८ ते ३३ महाविद्यालये तसेच सर्व अकृषी व अभिमत विद्यापीठे |
| ३ | नाशिक | ०६ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | के व्ही एन नाईक महाविद्यालय, नाशिक - नाशिक जिल्ह्यातील अ.क्र. ०१ ते १५ महाविद्यालये |
| ४ | नाशिक | ०७ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | के व्ही एन नाईक महाविद्यालय, नाशिक - नाशिक जिल्ह्यातील अ.क्र. १६ ते ३२ महाविद्यालये |
| ५ | नाशिक | ०८ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | के व्ही एन नाईक महाविद्यालय, नाशिक - नाशिक जिल्ह्यातील अ.क्र. ३३ ते ४५ महाविद्यालये व शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक |
| ६ | अहमदनगर | १२ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | प्रस्तूत कार्यालय – पुणे जिल्ह्यातील अ.क्र. ०१ ते २० महाविद्यालये |
| ७ | अहमदनगर | १३ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | प्रस्तूत कार्यालय – पुणे जिल्ह्यातील अ.क्र. २१ ते ३६ महाविद्यालये आणि ०३ शिक्षणशास्त्र महाविद्यालये |
| ८ | पुणे शहर | १४ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | प्रस्तूत कार्यालय – पुणे शहरातील अ.क्र. ०१ ते २५ महाविद्यालये |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | पुणे शहर | १५ मार्च, २०१८ | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० | प्रस्तूत कार्यालय – पुणे शहरातील अ.क्र. २६ ते ४३ महाविद्यालये आणि ०५ शिक्षणशास्त्र महाविद्यालये |

या प्रस्तावामध्ये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये ज्यांची नव्याने वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे आणि सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाच्या थकित रक्कमांच्या प्रस्तावांमध्ये ज्या कर्मचा-यांचा समावेश करण्यात आलेला नाही अशा सर्व प्रस्तावांचा समावेश करण्यात यावा. सदरहू प्रस्ताव सादर करण्यापूर्वी खाली दिलेल्या सूचना विचारात घ्याव्यात.

**१. अर्जित रजा रोखीकरण -** या कार्यालयाचे पत्र क्रमांक वेतन-२०१७/अशा.महा./१०/वेतनपथक, पुणे दिनांक ०७.१२.२०१७ अन्वये अर्जित रजा रोखीकरण व तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांच्या मानधनाची माहिती सादर करण्याबाबत कळविलेले होते. यापैकी अर्जित रजा रोखीकरण या बाबीसाठी आपल्या महाविद्यालयाने दिनांक ०७.१२.२०१७ च्या पत्रान्वये जी माहिती सादर केलेली आहे त्या प्रस्तावांव्यतिरिक्त या कार्यालयाकडून जर एखादे कर्मचा-यांचे रजा रोखीकरणास मान्यता दिलेली असले तर फक्त अशाच कर्मचा-यांची माहितीचा समावेश खालील विवरणपत्र १ मध्ये करण्यात यावा. याबाबत खालील कागदपत्रे प्रस्तावाच्या सोबत असणे आवश्यक आहे.

ए) या कार्यालयाने संबंधीत कर्मचा-याच्या नावे काढलेल्या आदेशाची प्रत.

बी) लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, पुणे विभाग, पुणे यांनी दिलेले अंतिम वेतन प्रमाणपत्र.

सी) देय असलेल्या रक्कमेचे परिगणन.

**परंतू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे यांनी मात्र यापूर्वी जरी अर्जित रजा रोखीकरण प्रस्ताव सादर केलेली असतील तरीदेखील पुन्हा एकदा प्रस्ताव सादर करण्यात यावेत.**

**२. तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधन -** आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती सादर करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक वेतन-२०१७/अशा.महा./१०/वेतनपथक, पुणे दिनांक ०७.१२.२०१७ अन्वये मागविण्यात आलेली होती. त्यामुळे या बाबीसाठी आपल्या महाविद्यालयाने दिनांक ०७.१२.२०१७ च्या पत्रान्वये जी माहिती सादर केलेली आहे त्या प्रस्तावांव्यतिरिक्त इतर कालावधीचे प्रस्तावाची माहिती विवरणपत्र २ मध्ये सादर करण्यात यावी. याबाबतच्या सविस्तर सूचना वर नमूद केलेल्या पत्रामध्ये देण्यात आलेल्या आहेत. माहितीस्तव पुन्हा एकदा सूचना देण्यात येत आहेत.

**अ. आपल्या महाविद्यालयाची माहिती तयार करतांना महिनानिहाय तयार करण्यात यावी.**

**ब. आपल्या महाविद्यालयातील ज्या कर्मचा-यांची नियुक्ती तासिका तत्वावर करण्यात आलेली आहे त्यांनादिलेल्या नियुक्तीचे आदेश व रुजू अहवालाची प्रत जोडणे आवश्यक आहे.**

**क. वरील विवरणपत्रामध्ये माहिती सादर करतांना आपले महाविद्यालय ज्या अकृषी विद्यापीठाशी संलग्नीतआहे त्यांनी आपल्या महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर नियुक्त केलेल्या कर्मचा-याचे नियुक्ती संदर्भातदिलेल्या मान्यतेची प्रत जोडणे आवश्यक आहे.**

**ड. या कार्यालयाने दिनांक ०१ ऑक्टोबर, २०११ चे विद्यार्थी संख्येवर आपल्या महाविद्यालयांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची पदनिश्चिती करुन दिलेली आहे. त्याची प्रत देखील प्रस्तावासोबत असणे आवश्यक आहे. तसेच त्यापैकी ज्या विषयासाठी तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे त्या विषयासाठी सध्या किती पदे भरलेली आहेत त्याची माहितीदेखील देण्यात यावी.**

**३. महागाई भत्ता -** शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मभवा-२०१७/प्र.क्र.११/सेवा-९ दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ अन्वये शासनाने महागाई भत्त्याच्या दरामध्ये ३ टक्के वाढ केलेली असून सदरहू वाढ ०१ फेब्रुवारी, २०१८ पासून रोखीने द्यावयाची आहे. या कार्यालयाने माहे फेब्रुवारी, २०१८ ची वेतनाची देयके यापूर्वीच प्राप्त करुन घेतली असल्यामुळे आता माहे फेब्रुवारी, २०१८ या महिन्याच्या वाढीव महागाई भत्त्याच्या रक्कमेची माहिती विवरणपत्र ३ मध्ये सादर करण्यात यावीत.

**४. अर्जित रजा रोखीकरण व तासिका तत्वावरील अधिव्याख्यात्यांचे मानधन आणि माहे फेब्रुवारी, २०१८ या महिन्याच्या वाढीव महागाई भत्ता याव्यातिरिक्त उर्वरित सर्व बाबींवरील प्रस्तावाचा समावेश विवरणपत्र ४ मध्ये करण्यात यावा.**

विवरणपत्र क्रमांक ४ मध्ये माहिती देताना व्यक्तीनिहाय माहिती सादर करावी आणि त्याचे फरकाचे तक्ते, वेतननिश्चितीच्या प्रती सोबत जोडण्यात यावेत. तसेच न्यायालयीन प्रकरणातील थकित रक्कमेच्याबाबतीत मा. न्यायालयाने दिलेले आदेश व त्या अनुषंगानेचा सर्व प्रस्ताव आवश्यक आहे. विद्यापीठ उशीरा मान्यतेच्या प्रस्तावाचे बाबतीत या कार्यालयाने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्राची प्रत, विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेची प्रत, या कार्यालयाने केलेली वेतननिश्चिती आणि फरकाचे तक्ते सोबत जोडण्यात यावेत. तसेच विवरणपत्र ०४ मधील फरकाची माहिती Microsoft Excel मध्ये देखील सादर करण्यात यावी. सदरहू प्रस्ताव यापूर्वी सादर केलेली असतील तरीदेखील सदरहू सर्व प्रस्ताव पुन्हा एकदा सादर करणे आवश्यकच आहे.

**उपरोक्त ४ ही विवरणपत्रांची माहिती निरंक असली तरी प्रत्येक विवरणपत्र निरंक सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त चारही विवरणपत्रांसोबत खालील प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.**

**प्रमाणपत्र**

मी, --------------------------------------- प्राचार्य, याद्वारे प्रमाणीत करण्यात येते की माझे पत्र क्रमांक ------------------------------ दिनांक ---------------------------- याद्वारे जी माहिती सादर करण्यात आलेली आहे ती माहिती मी स्वतः तपासली असून ती बरोबर आहे. सदर रक्कमा यापूर्वी संबंधीतांना अदा करण्यात आलेली नाही व मागणी करण्यात आलेली नाहीत तसेच सदर रक्कम प्रचलीत नियमानुसार अनुज्ञेय आहे व याबाबत खात्री केलेली आहे. या माहितीमध्ये काही फरक आढळल्यास अथवा शासनाकडून रक्कम येणे नसताना रक्कम प्रस्तावीत झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी माझी राहील.

स्वाक्षरी
महाविद्यालयाचे नांव व पत्ता

वरील सर्व सूचना विचारात घेऊन आपण आपली माहिती Microsoft Excel मध्ये Times New Roman या फॉन्टमध्ये आणि फॉन्ट साईझ १२ मध्ये हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीमध्ये (पेन ड्राईव्हमध्ये) वर नमूद केलेल्या विवरणपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे, ठिकाणी आणि वेळेत सादर करावी. यामध्ये कोणताही कर्मचारी वंचीत राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

## STATEMENT 1

## STATEMENT SHOWING THE AMOUNT OF EARN LEAVE ENCASHMENT

Name of the College – College Code -

| S. N. | Name of the Employee | Designation | Date of Retirement | Order No. & Date | Amount Rs. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

Signature of the Principal with Stamp

## STATEMENT 2

## STATEMENT SHOWING THE AMOUNT REQUIRED UNDER CLOCK HOUR BASIS

Name of the College – College Code -

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नांव | तासिका तत्वावर नियुक्त शिक्षकाचे नांव | विषय | महिना | तासिका | | | प्रात्यक्षिक | | | एकूण देय रक्कम रु. (८+११) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेतलेल्या तासिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | घेतलेल्या प्रात्यक्षिकांची संख्या | दर प्रति तास रु. | एकूण देय रक्कम रु. | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | **एकूण** | | | | | | | | | | |

Signature of the Principal with Stamp

## STATEMENT 3

## STATEMENT SHOWING THE AMOUNT OF D A ARREARS FOR THE MONTH OF FEBRUARY – 2018

Name of the College - College Code - Hte Sevarth Id -

| S. N. | Name of the Employee | Designa tion | Basic Pay | Grade Pay | Total | Arrears Amount of D A. @3% | Employee D C P S Share |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **A TEACHING** | | | | | | |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| | **TOTAL TEACHING** | | | | | | |
| | **B NON TEACHING** | | | | | | |
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| | **TOTAL NON TEACHING** | | | | | | |
| | **TOTAL TEACHING & NON TEACHING** | | | | | | |

Signature of the Principal with Stamp

## STATEMENT 4

## STATEMENT SHOWING THE AMOUNT AMOUNT OF ARREARS FOR THE YEAR 2017- 2018

Name of the College – College Code - Hte Sevaarth Id -

| S. N. | Name of the Employee | Placement in Senior Scale/ Selection Grade | Period | Fidder Cadre | Period | M.Phil/ Ph.D. Increments | Period | L. T. C. | Period | Late University Approval | Period | Court Case | Period | Time Bound Promotions | Period | Others if any | Reasons | Period | **Total** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | **TOTAL** | | | | | | | | | | | | | | | | | | |

Signature of the Principal with Stamp